ePaper

वर्ष - 7 । अंक -19 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । सोमवार, दि. 15 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## काँग्रेसने कर्नाटक जिंकलं, मविआला कॉन्फिडन्स आला!



### आतील पानांत


- पोलिसांनी सूत्रे फिरवली, २४ तासांच्या आत कारवाई!
- पुणेकरांनो, अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट, हनी ट्रॅप वाढलेत


# कानशिलात मारली म्हणून जीव घेतला!

## » किशोर आवारे हत्या प्रकरण : माजी नगरसेवक मुलगा अटकेत

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांच्या हत्येला वेगळं वळण मिळालं आहे. आवारे यांनी डिसेंबर महिन्यात भालचंद्र (भानू) खळदे यांना नगर परिषदेतील सीईओच्या दालनात सर्वांसमोर कानशिलात लगावली होती. हाच बदला घेण्यासाठी भालचंद्र खळदे यांचा मुलगा गौरव खळदेने किशोर आवारे यांची हत्या घडवून आणल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. याबाबतची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त पद्माकर घनवट यांनी दिली आहे.**





शुक्रवारी जनविकास समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून हत्या केली होती. याप्रकरणी आत्तापर्यंत सहा जणांना पिंपरी चिंचवड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त पद्माकर घनवट म्हणाले, डिसेंबरमध्ये तळेगाव नगरपरिषदेत भानुप्रताप खळदे आणि किशोर आवारे यांच्यात वाद झाला होता. किशोर आवारे यांनी सर्वांसमोर खळदे यांच्या कानशिलात लगावली. खळदे यांनी याबाबत अदखलपात्र तक्रार तळेगाव पोलीस ठाण्यात दिली होती. पुढे ते म्हणाले, भानुप्रताप खळदे यांचा मुलगा गौरव खळदे याला नेहमी वाटायचं की आपल्या वडिलांचा अपमान झाला, वडिलांची प्रतिष्ठा गेली. सर्वांसमोर त्यांनी मारले हा राग मुलगा गौरवच्या मनात होता. त्याने एक टीम तयार करून हत्या घडवून आल्याचं समोर येत आहे. आत्तापर्यंत सहा जणांना अटक केली आहे. अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी दिली आहे.

### जानेवारीपासून होता हत्येचा कट...


» दरम्यान गौरव खळदे हा सिव्हिल इंजिनिअर आहे. तो त्यांचा बांधकाम व्यवसाय संभाळतो. गौरव खळदेची आणि हत्या करणारा श्याम निगडकर यांची मैत्री आहे. गौरव खळदे हा श्यामला वेळोवेळी आर्थिक मदत करत होता. याच मैत्रीसाठी श्याम निगडकर आणि त्याच्या साथीदाराकडून किशोर आवारे यांची हत्या करण्यात आली. यासाठी जानेवारी पासून किशोर आवारे याच्या हत्येचा कट रचण्यात आला होता. गेल्या महिन्याभरापासून रेकी करत होते. अखेर नगरपरिषदेच्या कार्यालयात त्यांना गाठून हत्या केली.

# ... तर ती देशातील शेवटची निवडणूक ठरेल!

## » सामाजिक कार्यकर्तें विश्वंभर चौधरी : लोकशाहीची अध:पतनाच्या दिशेने वाटचाल

।पिंपरी । महाईन्यूज ।

**"2024 मध्ये मोदी पुन्हा सत्तेवर आल्यास ती देशातील शेवटची निवडणूक ठरेल," असे प्रतिपादन सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी यांनी श्री दत्त मंदिर चौक, मोहननगर, चिंचवड येथे केले. जय भवानी तरुण मंडळ आयोजित सहा दिवसीय फुले - शाहू - आंबेडकर लोकमान्य व्याख्यानमालेत 'भारतीय राजकारणाची दशा आणि दिशा' या विषयावरील तृतीय पुष्प गुंफताना डॉ.**



**विश्वंभर चौधरी बोलत होते.**

यावेळी माजी नगरसेविका ॲड. वैशाली काळभोर अध्यक्षस्थानी होत्या. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकर पांढारकर, उद्योजक भगवान पठारे, गणेश दातीर - पाटील, सुरेश चव्हाण आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. विश्वंभर चौधरी पुढे म्हणाले की, "2014 मध्ये नवे पंतप्रधान सत्तारूढ झाल्यावर खूप अपेक्षा होत्या; परंतु लवकरच अपेक्षाभंग झाला. अभिव्यक्तीवर घाला, बेमुर्वतपणा, सत्तेचा माज, न्यायव्यवस्था आणि राजकीय सत्ता यांचा परस्परपूरक व्यभिचार, ईडीचा गैरवापर अशा अनेक गोष्टींमुळे देशातील लोकशाही वेगाने अध:पतनाच्या दिशेने वाटचाल करते आहे. रोहित वेमुला, अखलाख अशा निरपराध लोकांचे मृत्यू, 'मन की बात' हा एकतर्फी संवाद, अनेक स्वायत्त संस्था आणि नियोजन आयोगाचे खच्चीकरण, फक्त विरोधकांसाठी ईडीचा दहशतवादी वापर ही हुकुमशाहीकडे वाटचाल सुरू झाली आहे. रकार म्हणजे देश, असे तत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. त्यामुळे सामान्य माणसांनी काय लिहावे, काय वाचावे हे सत्ताधारी ठरवू लागले आहेत. बेरोजगारी, महागाई याविषयी प्रश्न विचारल्यावर देशद्रोही ठरवले जाते. राष्ट्रपिता, राष्ट्रध्वज यांचा अपमान करणारे आपल्याला राष्ट्रवाद शिकवायला लागले आहेत. लहरीच्या एका फटक्यात नोटबंदी जाहीर केली गेली.

अर्थकारणात एकटा अदानी समूह सक्षम ठरवला गेला आहे. वीस हजार कोटी रुपयांचा घोटाळा होऊनही त्याविषयी मोदी अवाक्षरही बोलायला तयार नाहीत.

# पुणे-नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सुटणार!

## सर्वेक्षणानंतर 'या' सुधारणा प्रस्तावित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा त्रास केवळ नगर रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांनाच नव्हे तर त्या रस्त्याने पुण्यातून बाहेर पडणाऱ्या आणि आतमध्ये येणाऱ्या वाहनचालकांनाही मोठ्या प्रमाणात होत आहे. या रस्त्यावरील कोंडी सोडवण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने एकत्रित सर्वेक्षण केले. त्यानुसार अनेक ठिकाणी सुधारणा करण्यात येणार आहेत.**

पुणे-नगर रस्ता वाहतूक कोंडीसोबतच अपघातांचे प्रमाण वाढत आहे. लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्राणांतिक अपघातांची संख्या जास्त आहे. नगर रस्त्याची क्षमता ५० हजार पॅसेंजर कार युनिट (पीसीयू) आहे. प्रत्यक्षात ही क्षमता ७५ हजार पीसीयूपर्यंत पोहोचली आहे. म्हणजेच या रस्त्यावरून क्षमतेच्या दीडपट वाहने जात आहेत. त्यातच या रस्त्याभोवतीचे अतिक्रमण आणि वाहनचालकांच्या बेशिस्तीमुळे कोंडी वाढून अपघातांमध्ये वाढ होत आहे. नगर रस्त्यांवरील वाहतुकीचे सर्वेक्षण सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत भोसले आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या सर्वेक्षणात रस्त्यावरील अनेक समस्या समोर आल्या आहेत. त्यांची तातडीच्या आणि दीर्घकालीन अशी वर्गवारी करण्यात आली आहे. तातडीच्या उपाययोजना लगेच सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांकडे आरटीओकडून पाठपुरावा केला जाणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए), पुणे महापालिका, वाहतूक पोलीस यांच्यासोबत समन्वय साधून या उपाययोजना केल्या जातील



### नेमक्या सुधारणा काय?


- नगर रस्त्यावर सेवा रस्ताच नसल्याने गावांच्या हद्दीत महामार्गालगत लोखंडी रेलिंग उभारणे.
- वाघोलीच्या पुढे सध्या सिग्नल नसून अनेक चौकांमध्ये सिग्नल बसवणे.
- खडीची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असून, खडी रस्त्यांवर सांडून अपघात होत आहेत. अशा वाहनांवर कारवाई करणे.
- पीएमपी थांब्यावर निश्चित ठिकाणीच बस थांबवाव्यात, यासाठी पीएमपीएमएलला सूचना.
- नियम मोडून विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असल्याने त्यांच्यावर कारवाईची वाहतूक पोलिसांना सूचना.
- वाघोलीच्या पुढे भरधाव वाहनांवर कारवाई करण्यासाठी स्पीडगन बसवणे.

# पुणेकरांनो, अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट, हनी ट्रॅप वाढलेत

## अशा घटना तुमच्यासोबत पण होऊ शकतात

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोशल मीडियाद्वारे फसवणुकीच्या घटना वाढलेल्या असताना एखाद्या व्यक्तीला हेरून मैत्रीच्या जाळ्यात (हनी ट्रॅप) अडकविण्याच्या घटनाही पुन्हा घडू लागल्याने सायबर सुरक्षेचा प्रश्न अधोरेखित झाला आहे. फायद्यासाठी व्यक्तीला निवडून त्याच्या आवडीनिवडी जाणून लक्ष्य केले जात असल्याने समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना समाजमाध्यमांत वावरताना काळजी घ्यावी लागणार आहे. संरक्षण विभागातील पुण्यातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ ऑनलाइन मैत्रीच्या**



**जाळ्यात (हनी ट्रॅप) अडकल्याने 'सेक्सटॉर्शन'नंतर 'हनी ट्रॅप'चा धोका अधोरेखित झाला आहे.**

संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे (आर अँड डीई-ई) संचालक डॉ. प्रदीप कुरुलकर यांच्या अटकेच्या निमित्ताने 'हनी ट्रॅप'ची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. समाजमाध्यमाद्वारे बदनामीच्या पाच हजारांपेक्षा जास्त तक्रारी गेल्या दीड वर्षांत शहरात दाखल झाल्या आहेत. राजकीय फायद्यासाठी सोशल मीडियाद्वारे फसवणूक आणि बदनामी करण्याचे प्रकार वाढले आहेत. सायबर पोलिसांकडे दीड वर्षांत 'सेक्सटॉर्शन'च्या सुमारे दोन हजार तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. सन २०२१मध्ये अशा प्रकारच्या ६८२ तक्रारी दाखल झाल्या होत्या. या प्रकारांना आळा घालण्यासाठी बदनामीच्या भीतीने तक्रार नको, अशी मानसिकता बाळगण्याऐवजी पीडित लोकांनी तक्रार दाखल करण्यासाठी त्वरित पुढे यावे, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. तक्रारदारांची संख्या वाढत असली, तरी बदनामीच्या भीतीने तक्रार दाखल न करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. अश्लील फोटो आणि व्हिडिओची भीती दाखवून खंडणीची धमकी देण्याचे प्रकार वाढल्याने अनोळखी 'फ्रेंड रिक्वेस्ट'पासून सावध राहा, असा सल्ला सायबर पोलिस आणि सायबरतज्ज्ञांनी दिला आहे.

### हनी ट्रॅप, सेक्सटॉर्शन आणि लोन ॲप

'सेक्सटॉर्शन'च्या प्रकारात एकावेळी अनेकांशी संवाद साधला जातो. वैयक्तिक आणि लैंगिक संवाद साधून तरुणांना जाळ्यात ओढले जाते. त्यांची छायाचित्रे आणि दृश्यफितींमध्ये फेरफार करून ती प्रसारित करण्याची धमकी दिली जाते. खंडणीची मागणी केली जाते. 'लोनॲप'च्या प्रकारात कर्जाचे आमीष दाखविले जाते. कर्ज फेडण्यास विलंब झाल्यास खासगी माहिती प्रसारित करून बदनामी केली जाते.

# मोबाइल चोरीच्या घटना ऐकल्या असतील, पण थेट टॉवर?

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मोबाइल हिसकावणाऱ्या चोरीच्या घटना घडत असतानाच, मोबाइलसाठी नेटवर्क पुरविणाऱ्या टॉवरचीच चोरी झाली आहे. बंद अवस्थेतील मोबाइल मनोऱ्यांचे (टॉवर) साहित्य चोरणाऱ्या टोळीला पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून १३ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

रमेश मल्लाप्पा गरसंगी (वय ३३, रा. मळघन, ता. बसवन बागेवाडी जि. विजयपुरा कर्नाटक), प्रशांत वामन यादव (वय ३१, रा. वडकी ता. हवेली, मूळ रा. हर्णे ता. पुरंदर), सुहास श्रीराम लाड (वय ४०, रा. मांजरी बु ) जावेद हमीदुल्ला खान (वय ३३, रा. भेकराईनगर, फुरसुंगी ) आणि सचिन गणपत कदम (वय ४१,



रा. कोंढवा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

जीटीएल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या रांजणगावातील पाचंगे वस्ती परिसरातून बंद अवस्थेतील मोबाइल मनोऱ्यातील साहित्य चोरीची घटना २८ जानेवारी रोजी घडली होती. चोरट्यांनी १५ लाखांचे साहित्य चोरून नेले होते. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाचा आधारे आरोपींना कर्नाटक राज्यातून आणि पुणे जिल्हा परिसरातून ताब्यात घेतले. आरोपींनी जीटीएल कंपनीचे सातारा, रत्नागिरी, सांगली, पुणे, बीड, रायगड अशा सहा जिल्ह्यांतील दहा मोबाइल मनोऱ्यांची चोरी केल्याची कबुली दिली आहे.

# ‘ऑनलाईन’ मिळकत कर भरणीला पसंती!

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : मिळकतधारांनी घेतला सवलतींचा लाभ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मिळकतकराचा अधिकाधिक भरणा व्हावा, यासाठी महापालिका प्रशासक शेखर सिंह यांनी निरंतर कर वसुली, सर्वंकष मालमत्ता सर्वेक्षण आणि माहितीचे शुद्धीकरण अशी त्रिसूत्री आखून कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अवघ्या दीड महिन्यात शहरातील ८७ हजार ४५६ मिळकतधारकांनी शंभर कोटींपेक्षा अधिक रकमेचा कर भरला आहे. त्यात ७० हजार ४८९ नागरिकांनी सुमारे ८० कोटी रुपयांचा ऑनलाइन करभरणा करून विविध सवलतींचा लाभ घेतला.**





नागरिकांनी ३० जूनपूर्वी कर भरून विविध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिंह यांनी केले आहे. महापालिकेने सिद्धी प्रकल्पाअंतर्गत मिळकतधारकांना घरपोच बिलांचे वाटप सुरू केले आहे.

याशिवाय, सर्वांना घर बसल्या सुविधांचा लाभ घेता यावा, यासाठी सर्व सुविधा ऑनलाइन केल्या आहेत. ई-मेलची सुविधा उपलब्ध आहे. सारथी हेल्पलाइनमध्ये करसंकलन विभागासाठी ‘२४ बाय ७’ सुविधा उपलब्ध आहे. शहरात औद्योगिक, निवासी, बिगर निवासी, मिश्र आणि मोकळ्या जमीन अशा पाच लाख ९८ हजार मिळकती शहरात आहेत. १२ हजार १७९ मिळकतधारकांनी १० कोटी ५९ लाख रुपयांचा रोखीने भरणा केला आहे.

विविध ॲपच्या माध्यमातून एक हजार २३८ जणांनी एक कोटी पाच लाखांचा कर भरला आहे. तर धनादेशाद्वारे दोन हजार ३७७ जणांनी सहा कोटी ४८ लाखांचा भरणा केला आहे.

### करभरणा केलेल्या मिळकती

| प्रकार | संख्या |
|---|---|
| औद्योगिक | ३६० |
| निवासी | ८०,५२३ |
| बिगर निवासी | ४,९७६ |
| मिश्र | १,१४४ |
| मोकळ्या जमीन | ४६६ |
| इतर | ६ |

### वाकडमध्ये अधिक भरणा

महापालिकेचे शहरात १७ करसंकलन कार्यालये आहेत. वाकड कार्यालयात १४ हजार ७६८, थेरगाव कार्यालयात नऊ हजार २२८, चिंचवडमध्ये आठ हजार ४७०, सांगवीमध्ये आठ हजार ३८७ नागरिकांनी कर भरला आहे. सर्वात कमी पिंपरीनगर कार्यालयात केवळ ७१४ व तळवडेत ७१८ जणांनीच करभरणा केला आहे.

> “करसंकलन विभागाकडून त्रिसूत्रीनुसार काम सुरू आहे. जूनपूर्वी वार्षिक उद्दिष्टाच्या पन्नास टक्के कर वसुलीचे उद्दिष्ट आहे. नागरिकांनी या जूनपूर्वी करभरणा करून सवलतींचा लाभ घ्यावा.”
>
> - नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, महापालिका

# बार्डव्हॅली उद्यानात शिवकालीन शस्त्र प्रदर्शन

## छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

।पिंपरी । महाईन्यूज ।

**भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समिती व छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६६ व्या जयंतीच्या पूर्व संध्येला बार्डव्हॅली उद्यानात शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भरवण्यात आले होते.**



या शस्त्र प्रदर्शनाचे पूजन तुषार हिंगे, सागर तापकीर व संदीप थोरात यांच्या हस्ते फुल व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या प्रदर्शनाला शहरातील शंभूप्रेमींनी भरभरुन प्रतिसाद दिला. सायंकाळी उशिरा बर्डव्हॅली उद्यानात अतिशय आनंदाच्या वातावरणात फटाक्यांची आतिषबाजी करत स्मारकाच्या सर्व बाजूला शेकडो पंत्या लावून व मशालज्योत पेटवून शंभुप्रेमींच्या उपस्थितीत दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी तुषार हिंगे, प्रफुल्ल पुराणिक, भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीचे सागर तापकीर,अभिषेक म्हसे, जालिंदर खतकर, संदीप थोरात, विनायक जाधव, अमोल तोडकर, संतोष वाघे, गौरव गोसावी, गणेश मराठे, प्रशांत बाराथे, सोनाली हिंगे, सानिया तापकीर, राजेंद्र पाटील, योगीश गडवाणी, गणेश नांगरे, सुनील गुंजवटे, अमीत देशमुख, विक्रम जानगुडे, विकी पिंजरकर, पल्लवी थोरात, मनीषा पाटील, दिपाली शिंदे. यांच्यासह शहरातील शंभूप्रेमी उपस्थित होते.

# मावळ व पुणे लोकसभा मतदारसंघाच्या अध्यक्षपदी विश्वजीत बारणे यांची निवड



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

युवासेना पिंपरी चिंचवड शहर प्रमुख विश्वजीत बारणे यांची मावळ व पुणे लोकसभा मतदारसंघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पिंपरी चिंचवड युवासेनेकडून पुणेरी पगडी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

‘गाव तिथे शाखा व घर तेथे शिवसैनिक’ या तत्त्वावर पुणे लोकसभा व मावळ लोकसभेमध्ये संघटनेचे काम करू, तसेच शिवसेना भाजपा सरकारच्या सर्व योजनांचा नागरिकांना लाभ मिळवून देऊ असे प्रतिपादन विश्वजीत बारणे यांनी यावेळी केले.

ह्या वेळेस शिवसेना खासदार श्रीरंग आप्पा बारणे, जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहर प्रमुख निलेश तरस, बशीर सुतार, अविनाश जाधव, मनोज काची, संदीप घुले, चिंचाप्पा निंगदोळे उपस्थित होते. सत्काराचे आयोजन पिंपरी व अधिकारी निलेश हाके यांनी केले होते.

# सांगेन गोष्टी युक्तीच्या चार




सर्वोच्च न्यायालयाने एकाच दिवशी दिलेल्या दोन निकालांमधली एक समान गोष्ट म्हणजे, घटनापीठाने राज्यपालांच्या भूमिका, स्थान, मर्यादा आणि अधिकार यांबाबत केलेले काही स्पष्ट व काही आनुषंगिक विवेचन. हा विषय नवा नाही. गेली जवळपास पाच दशके राज्यपालांच्या नेमणुका, त्यांच्या पक्षीय भूमिका, त्यांचे पक्षपाती वर्तन किंवा सरकारे आणण्या-घालवण्यातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भूमिका यांबाबत चर्चा चालू आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आल्यानंतर काही नेत्यांनी ‘हवे कशाला हे पद? राज्यपालांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आहेत की उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती,’ अशा स्वरूपाचा उद्वेग व्यक्त केला आहे. त्याला क्षणिक महत्त्व आहे. भारतीय घटनाकारांनी फार विचार करून हे पद निर्माण केले. त्याचे अधिकार, कर्तव्ये यांवर घटना समितीच्या बैठकांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाल्या आहेत. एका चर्चेचा अर्थपूर्ण समारोप करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, की कोणत्याही राज्यपालाची दोनच मुख्य कामे असायला हवीत. पहिले, मंत्रिमंडळाचा कारभार चालू ठेवणे. याचा अर्थ, मंत्रिमंडळ काही घटनाबाह्य काम करीत नाही ना, याकडे लक्ष ठेवणे. म्हणजेच राज्याच्या कारभाराच्या घटनात्मक चौकटीचे भान ठेवणे. बाबासाहेबांच्या मते राज्यपालांचे दुसरे मूलभूत काम म्हणजे, मंत्रिमंडळाला योग्य तो सल्ला देत राहणे. सूचना देत राहणे. एखाद्या निर्णयाला वाटले तर पर्याय सुचविणे आणि काही चुकीचे घडत असेल, तर राज्य सरकारला इशारा देणे. या ‘सांगेन गोष्टी युक्तीच्या चार...’ पलीकडे राज्यपालांनी सरकारच्या दैनंदिन कामात, कारभारात किंवा निर्णयप्रक्रियेत अणुमात्रही हस्तक्षेप करता कामा नये, अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. ती त्यांनी तेव्हा अनेकदा स्पष्टपणे साऱ्या सदस्यांपुढे मांडली.

राज्यपालांचे पद आणि कामाविषयी इतकी स्पष्टता असतानाही, आजवरच्या सर्व राज्यकर्त्यांनी या पदाचे केवळ अवमूल्यनच केले नाही, तर आपल्या राजकीय पटावरील प्यादे म्हणूनही वापरले आहे. ते आजही चालूच आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या दोन्ही निकालांमध्ये याबद्दलची तीव्र प्रतिक्रिया



उमटली आहे. राज्यपालांसारख्या घटनात्मक पदाबाबत कोणतेही न्यायालय नाराजी व्यक्त करणे, इतकेच करू शकते. या पलीकडे ते काय करणार? याबाबत केंद्र सरकार, या पदावर येणारे महानुभाव आणि त्या त्या राज्यांचे मुख्यमंत्री यांनी आपले वर्तन तपासून पाहायला हवे. आपल्या राज्यपालांचा अपमान करण्यात, त्यांना खिजविण्यात व डिवचण्यातच अनेक मुख्यमंत्री आणि नेत्यांचे शौर्य खर्ची पडते. त्यानेही वातावरण बिघडते. आपण केंद्र सरकारचे प्रतिनिधी आहोत; केंद्रातल्या सत्ताधारी पक्षाचे ‘पाहुणे’ नाही, हा विवेक घटनेतील कलमांमधून येत नाही. तो प्रत्येक व्यक्तीला अंगिकारावा लागतो. डॉ. पी. सी. अलेक्झांडर महाराष्ट्राचे राज्यपाल असताना सत्तांतरे झाली. मात्र, त्यांचे नेमस्त वर्तन त्यामुळे बदलले नाही. विद्यापीठांचे कुलपती या भूमिकेत त्यांनी अनेक अन्याय रोखले. विद्यापीठांचे कारभार सुधारले. माजी राज्यपाल कोश्यारी यांनी विधान परिषदेतील नेमणुका रोखल्या. याचे एक कारण म्हणजे, या निर्णयाच्या कालावधीचा स्पष्ट उल्लेख कायद्यात नाही. मात्र, अखिलेश यादव मुख्यमंत्री असताना, उत्तर प्रदेशाचे राज्यपाल राम नाईक यांच्याकडे अशीच यादी आली होती. त्यातील आक्षेपार्ह नावांबद्दल शंका व्यक्त करून राज्यपालांनी ती परत पाठवली. नंतर अखिलेश यांनी राज्यपालांच्या सूचना मान्य करून नवी यादी पाठवली. ती राम नाईक यांनी मान्य केली. नेमणुका मार्गी लावल्या. तेव्हा कोणत्याही पदाचे काम केवळ नियमांनी होत नाही. भारतासारख्या कमालीच्या गुंतागुंतीच्या देशात राज्यपालांना अनेकदा चौकट ओलांडून देशहिताची कामे करावी लागतात. अर्जुनसिंह मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री होण्याच्या तयारीत होते; पण राजीव गांधी यांनी त्यांना पंजाबात राज्यपाल केले. पंजाब तेव्हा जखमी होता. त्याला सावरण्याची गरज होती. ते काम अर्जुनसिंह यांनी कौशल्याने केले. जगमोहन यांनी आणीबाणीत दिल्लीचे नायब राज्यपाल म्हणून जितका बदलौकिक कमावला; तितकेच दहशतवाद आटोक्यात ठेवण्यासाठी त्यांनी काश्मीरचे राज्यपाल म्हणून चांगलेही काम केले.

तमिळनाडूच्या मंत्रिमंडळाने राजीव गांधी यांच्या हत्येतील सर्व दोषींची तुरुंगातून सुटका करावी, असा एकमताने ठराव केला. तो राज्यपालांनी विवेक बाळगून अनेक वर्षे रोखून धरला. नंतर राष्ट्रपतींकडे पाठवला. संसदीय लोकशाहीत असे प्रत्येक पदाचे महत्त्व असते. सर्वांनी मिळून कारभाराचा गाडा सुरळीत हाकायचा असतो. लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर भारतात राज्यपाल या पदाचे वेगाने अवमूल्यन सुरू झाले. अनेक राजभवने राजकीय अड्डे बनले. अनेक राज्यपाल राजकीय आखाड्यात उतरले. ही अवनती आजही चालू आहे. त्याकडेच सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले आहे. या पदाची प्रतिष्ठा जपण्याचे मुख्य काम केंद्र सरकारचे आहे. त्या दृष्टीने पंतप्रधानांनी घटनापीठाच्या गंभीर निरीक्षणांची दखल घ्यायला हवी.

## संपादकीय »

### गंभीर प्रश्नांचे मोहोळ

***भारतावरील आक्रमणांचा इतिहास काही हजार वर्षांचा आहे. नव्या आक्रमणांच्या युद्धभूमी, युद्धतंत्र आणि युद्धभाषा बदलल्या आहेत. त्या समजावून घ्यायला हव्यात. त्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.***

राजीव मल्होत्रा हे अत्यंत आक्रमक शैलीत लेखन करणारे विचारवंत आहेत. एकीकडे प्रस्थापित समज, ठोकताळे, आकलन मोडून काढायचे आणि दुसरीकडे भविष्यातील (त्यांना वाटणाऱ्या) धोक्यांकडे विचारी जनांचे लक्ष वेधायचे, समाजाला इशारे द्यायचे, त्यासाठी भरपूर प्रवास करायचा व ग्रंथलेखन करायचे, हा त्यांचा गेल्या काही दशकांचा शिरस्ता आहे. यातून अनेक पुस्तके जन्माला आली. ‘ब्रेकिंग इंडिया’ हे त्यांचे पुस्तक येऊन बराच काळ लोटला. या पुस्तकात त्यांनी भारतात कोणताही सज्जड पुरावा नसताना ‘द्राविडीयन संस्कृती’चा सवतासुभा कसा उभा केला आहे, याचे विश्लेषण केले होते. या पाश्चात्त्यांच्या व त्यांच्या बौद्धिक प्रभावाखालील देशी अभ्यासकांच्या दुफळीबाज कामाला आता ‘द्राविडी ख्रिस्ती’ चळवळीचा नवा आयाम आला आहे, असा त्यांचा दावा होता.

**पाकिस्तानातला उद्रेक अभूतपूर्व आहे. माजी पंतप्रधान आणि एकेकाळचे तुफानी वेगाचे गोलंदाज इम्रान खान यांना अटक झाल्यापासून सारा देश रस्त्यावर उतरला आहे. पाकिस्तानात सर्वांत जास्त दहशत लष्कराची असते. त्या लष्कराची ठाणी, कार्यालये, छावण्या यांच्यावर शेकडो संतप्त नागरिक चालून जात आहेत. लष्कराची मालमत्ता पेटवून देत आहेत.**

## अराजकाच्या ज्वाळा

जमेल ती लुटत आहेत. प्रत्येक निदर्शकावर गोळीबार करायचे ठरवले, तर इस्लामाबाद, पेशावर आणि देशभरात लष्कराला लाखो मुडदे पाडावे लागतील. ते शक्य नाही. हा असंतोष कुठल्या टोकाला जातो आहे, याचा अंदाज जगातले प्रमुख देश घेत आहेत. भारताला सीमेवरची सज्जता आणि पुढील संकटांचा अंदाज घेणे, या दोन्ही आघाड्यांवर काम करावे लागणार होतेच. तसे ते सुरू झाले आहे. पाकचे पाताळयंत्री लष्करशहा परवेझ मुशर्रफ यांनी ‘राष्ट्रीय उत्तरदायित्व ब्यूरो’ म्हणजे ‘एनएबी’ जन्माला घातला होता. भ्रष्टाचार, आर्थिक दहशतवाद किंवा गैरव्यवहार रोखण्यासाठी तो स्थापन झाला असला, तरी तेव्हा त्याचे मुख्य लक्ष्य शरीफ कुटुंबीय होते. नवाझ शरीफ यांना याच ब्यूरोच्या जाळ्यात अडकविण्यात आले होते. आज नवाझ यांचे बंधू शाहबाज पंतप्रधान असताना, या ब्यूरोने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली. इम्रान खान यांच्या विरोधात तब्बल ८० आर्थिक गैरव्यवहार आणि आर्थिक दहशतवादाचे गुन्हे या ब्यूरोने नोंदविले आहेत. यंदा मार्च महिन्यात निवृत्त झालेले लेफ्टनंट जनरल नझीर अहमद बट्ट यांना या ब्यूरोचे प्रमुख करण्यात आले, तेव्हाच इम्रान यांच्या गळ्याभोवती फास आवळला जाईल, हे स्पष्ट झाले.

बुधवारी पाकिस्तानातील पंजाब, बलुचिस्तान आणि खैबर पख्तूनख्वा या तिन्ही प्रांतांमधील परिस्थिती हाताबाहेर गेली. तिथे लष्कराला पाचारण करावे लागले आहे. काही ठिकाणी रस्त्यांवर तोफा रोखलेले रणगाडे उतरले. मात्र, जाळपोळीचे सत्र थांबले नाही. संतप्त नागरिक रस्त्यांवरच ठाण मांडून आहेत. हा उद्रेक आणि संताप म्हणजे केवळ इम्रान यांच्यावरचे प्रेम किंवा निष्ठा नाही. पाकिस्तानी सामान्य नागरिक अनंत आपदांनी इतका जर्जर, जखमी झाला आहे, की आपला संताप व्यक्त करण्यासाठी इम्रान यांची अटक, ही त्याला संधी वाटते आहे. उपाशी राहून मरायचे की गोळ्या खाऊन, असा विचित्र पेच गगनभेदी



महागाईने लोकांसमोर टाकला आहे. पाकिस्तानी नागरिकांच्या लष्करासमोरच्या निर्भयतेचे तेही एक इंगित आहे. ‘आपल्या जिवाला धोका आहे,’ असे इम्रान खान म्हणाले आहेत. त्यांना वाटणारी ही भीती चूक नाही. इम्रान यांच्या पाठोपाठ बुधवारी त्यांचे विश्वासू सहकारी आणि माजी परराष्ट्रमंत्री शाह महमूद कुरेशी यांनाही बेड्या ठोकण्यात आल्या. भ्रष्टाचार आणि हिंसाचाराला चिथावणी असा आरोप त्यांच्यावर आहे. इम्रान यांचा पक्ष असा निर्नायकी होत गेला, तर देशातला हिंसाचार रोखण्यासाठी आवाहन तरी कोण करणार, हा विचारही लष्कराने करू नये, हे धक्कादायक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अड़काल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# काँग्रेसने कर्नाटक जिंकलं, मविआला कॉन्फिडन्स!

## वज्रमूठ सभेबद्दल मोठा निर्णय: महाविकास आघाडी बैठक

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'कर्नाटकमध्ये काँग्रेसने भाजपला आस्मान दाखवल्यानंतर आत्मविश्वास दुणावलेल्या मविआ नेत्यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या निवासस्थानी बैठक घेऊन भाजपला महाराष्ट्रातही पराभूत करण्यासाठीचा प्लॅन आखला. येत्या काळात जागा वाटपाची चर्चा पूर्ण करु, असं जयंत पाटील यांनी सांगितलं.**

उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन स्थगिती करण्यात आलेली महाविकास आघाडीची 'वज्रमूठ' सभा पुन्हा एकदा सुरू करणार असल्याचा निर्णय आजच्या महाविकास आघाडीच्या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. कर्नाटकच्या विजयानंतरच्या दुसऱ्याच दिवशी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सिल्वर ओक निवासस्थानी मविआ नेत्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीला स्वत: शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले, जयंत पाटील, अजित पवार, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण, संजय राऊत, आदी नेते उपस्थित होते. बैठकीनंतर जयंत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला.

### जागावाटपावर लवकरच चर्चा

भविष्यात येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी तिन्ही पक्षाचे प्रमुख आणि इतर घटक पक्ष बसून जागा वाटपाबाबत चर्चा करणार आहेत. याशिवाय महाविकास आघाडीचे एकत्रित संघटन व ठाम पर्याय महाराष्ट्राला सक्षमपणे देण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीचा असणार आहे यावर एकमत आजच्या बैठकीत झाल्याचेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.



कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरुन अधिक मोठ्या संख्येने आणि ताकदीने महाविकास आघाडी पुढच्या काळात काम करेल असा विश्वासही जयंत पाटील यांनी व्यक्त केला. सुप्रीम कोर्टात जो निर्णय झाला त्याचा तपशील आपण वाचला आहे. सुप्रीम कोर्टाने मर्यादा घालून विधानसभा अध्यक्षाना निर्णय घेण्याची जबाबदारी दिली आहे.

लवकरात लवकर निर्णय द्यावा असे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. त्यादृष्टीने विधानसभा अध्यक्ष निर्णय घेतील अशी अपेक्षा जयंत पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

# दक्षिणेत भाजपची नाकाबंदी, महाराष्ट्रातही सत्तांतर होणार!

## कर्नाटकच्या निकालाने अजितदादांचा आत्मविश्वास दुणावला!

। नवी मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकात भाजपचा धुव्वा उडवत काँग्रेसने स्पष्ट बहुमताने राज्याची सत्ता काबीज केली आहे. कर्नाटक विधानसभेच्या २२४ जागांपैकी १३६ जागांवर काँग्रेसने विजयी पताका फडकावली. या विजयाने काँग्रेस कार्यकर्त्यांसह बिगरभाजप पक्षांच्या नेते आणि कार्यकर्त्यांमध्येही उत्साह निर्माण झाला आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील नेत्यांकडूनही या विजयानंतर काँग्रेसचं अभिनंदन करत भाजपवर निशाणा साधला जात आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही ट्वीट करत काँग्रेस कार्यकर्त्यांचं अभिनंदन केलं आणि महाराष्ट्रातही महाविकास आघाडीची सत्ता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.**



कर्नाटक विधानसभा निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसला दिलेला कौल हा कर्नाटक आणि देशाच्या राजकारणाची वाटचाल पुन्हा एकदा विकास आणि लोकशाही मजबूत करण्याच्या दिशेनं सुरू झाल्याची नांदी आहे. कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयानं भाजपची दक्षिणेकडील पुरती नाकाबंदी केली आहे,' असा हल्लाबोल अजित पवारांनी केला. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना, मित्रपक्षांची महाविकास आघाडी महाराष्ट्रातही याची पुनरावृत्ती करेल. महाराष्ट्रातील जनतेनं तसा निर्धार आधीच केला आहे. कर्नाटकातील मतदार, काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन, असंही अजित पवार म्हणाले. 'सामान्य जनता महागाई, बेरोजगारीने त्रस्त आहे. परंतु यावर काहीच न बोलता द्वेष आणि फक्त द्वेष पसरवण्याचं काम सत्ताधारी गटाकडून सुरू आहे. पैशाचा, खोक्यांचा वारेमाप वापर करून प्रसंगी केंद्रीय यत्रणांना हाताशी धरून सत्तेचा जो माज सत्ताधारी गटाला चढला होता, तो माज मात्र सामान्य जनतेच्या नजरेत खुपत होता. लोकांनी त्यांचा हा राग मतपेटीच्या माध्यमातून व्यक्त केला,' अशा शब्दांत जितेंद्र आव्हाड यांनी भाजपचा समाचार घेतला आहे.

### जितेंद्र आव्हाडांचाही भाजपविरोधात हल्लाबोल

**कर्नाटकमधील काँग्रेसच्या विजयानंतर राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनीही भाजपवर निशाणा साधला आहे. 'कर्नाटक, गोवा, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र ही चार राज्य भाजपने खोक्यांचा वापर, तसेच केंद्रीय यत्रणांच्या दहशतीचा वापर करून ताब्यात घेतली होती. मात्र कर्नाटकच्या विजयाने सिद्ध झालं की, लोकांना सुडाचं राजकरण आवडत नाही आणि त्यामुळेच कर्नाटकच्या जनतेने काँग्रेसला स्पष्ट बहुमत देत भाजपच्या खरेदी-विक्रीच्या धोरणाला मूठमाती दिली. हाच या विजयाचा अन्वयार्थ आहे,' असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.**

### मोदी शहांचा खुळखुळा आता चालणार नाही

**सामान्य जनता हुकुमशहांचा पराभव करू शकते. भाजपचे लोक धमक्या, दडपशाही करत होते. कर्नाटकमधील भाजपचा पराभव देशवासीय साजरा करत आहेत. या पराभवातून दिल्लीने धडा घ्यावा. मोजकी राज्य सोडली तर भाजपकडे आता राज्ये नाहीयेत. गुजरात, उत्तर प्रदेश यावर दिल्ली जिंकता येत नाही. आम्ही भाजपच्या पराभवाचे पेढे वाटतो, सामान्य माणसाने भाजपचा पराभव केला. नरेंद्र मोदी आणि अमित शाह ही खेळणी आता चालणार नाही. ईडीच्या धमकीने कुणी बधणार नाही. देवेंद्रजी- मी पैज लावून सांगतो २०२४ ला मोदींचं सरकार पुन्हा सत्तेत येत नाही, अशी भविष्यवाणीच ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केली.**

# सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग!

## कर्नाटक काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक; खरगे यांच्याकडे मुख्यमंत्री निवडीचे सर्वाधिकार

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकमध्ये काँग्रेसने निर्विवाद बहुमत मिळविल्यानंतर आता सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह तिघांची निरीक्षक म्हणून रविवारी नियुक्ती केली. बंगळूरुमध्ये झालेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत निरीक्षकांनी आमदारांच्या भावना जाणून घेतल्या. त्याआधारे मुख्यमंत्री कोण होणार, याचा निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील, असे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी स्पष्ट केले.**

कर्नाटक विधानसभा निवडणुकीत शनिवारी झालेल्या मतमोजणीमध्ये काँग्रेसने २२४ पैकी १३५ जागा मिळवून बहुमत प्रस्थापित केले आहे. त्यानंतर आता माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांच्यामध्ये मुख्यमंत्रीपदासाठी चुरस आहे. शिंदे यांच्यासह पक्षाचे सरचिटणीस जितेंद्र सिंह आणि अ.भा. काँग्रेसचे माजी सरचिटणीस दीपक बाबरिया यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा अ.भा. काँग्रेसचे सरचिटणीस (संघटन) के.सी. वेणुगोपाल यांनी केली. सिद्दरामय्या आणि शिवकुमार (६०) या दोघांनीही निष्ठावंत आमदारांसोबत बैठका घेऊन आपली तटबंदी अधिक भक्कम करण्यास सुरुवात केली आहे.

### शिवकुमार यांचे सूचक भाष्य

निवडणुकीत आपण सर्वांना सोबत घेतले आणि स्वत:साठी कधीही काहीच मागितले नाही, असे प्रदेशाध्यक्ष शिवकुमार यांनी म्हटले आहे. कर्नाटकमधील तुमकुरु येथे आले असता 'ज्यांना लोकांची पसंती आहे त्यांना की ज्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले अशांना प्राधान्य द्यायला हवे,' असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर '२०१९ साली काँग्रेसचा पोटनिवडणुकांमध्ये पराभव झाल्यानंतर सिद्धरामय्यांच्या राजीनाम्यानंतर पक्षाने माझ्यावर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. खोट्या प्रकरणात मला तुरुंगात पाठविले असताना सोनिया गांधी आपल्या पाठीशी उभ्या राहिल्या', असे उत्तर त्यांनी दिले. सिद्धरामय्या यांच्यासोबत मतभेद असल्याचा इन्कार करतानाच मुख्यमंत्रीपदाचा निर्णय पक्षश्रेष्ठी आणि विधिमंडळ पक्ष घेईल, असे शिवकुमार म्हणाले.






### समर्थकांचे 'फलकयुद्ध'

**पक्षात मुख्यमंत्री निवडीसाठी खलबते सुरू असतानाच सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्या समर्थकांमध्ये फलकयुद्ध रंगल्याचे बघायला मिळाले. राजधानी बंगळूरुसह अन्य शहरांमध्ये दोघांनाही मुख्यमंत्रीपदाच्या शुभेच्छा देणारे फलक झळकले आहेत. शिवकुमार यांच्या घराबाहेर लागलेल्या पोस्टरमध्ये 'नवे मुख्यमंत्री शिवकुमार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा' असा मजकूर आहे. तर सिद्धरामय्या यांच्या घरासमोरही 'भावी मुख्यमंत्री' असा उल्लेख असलेले पोस्टर लावण्यात आले आहे.**

> **"पक्षाचे निरीक्षक आमदारांच्या भावना जाणून घेतील आणि पक्षश्रेष्ठींच्या कानावर घालतील. त्यानंतर मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घेतला जाईल. सर्वकाही व्यवस्थित सुरू असून कर्नाटकात काँग्रेसचे सरकार लवकरच स्थापन होईल.**
>
> **– मल्लिकार्जुन खरगे,**
> **अध्यक्ष, काँग्रेस**

---

# 'ब्राह्मोस'ची यशस्वी चाचणी!

## विनाशक युद्धनौका 'आयएनएस मुरगाव'वरून क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नौदलाकडून रविवारी ब्राह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली. नौदलाची अग्रगण्य स्वयंचलित क्षेपणास्त्र प्रक्षेपण करणारी विनाशक युद्धनौका 'आयएनएस मुरगाव'वरून या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या चाचणीचे ठिकाण कळू शकले नाही.**



अधिकाऱ्यांनी सांगितले, की ही युद्धनौका व हे शक्तिशाली क्षेपणास्त्र दोन्ही स्वदेशी निर्मिती व आत्मनिर्भरतेचे झळाळणारी बोलकी प्रतिके आहेत.

या यशस्वी चाचणीमुळे भारतीय नौदलाच्या सागरातील मारक क्षमतेचे प्रदर्शन केले. या नव्या युद्धनौकेवरून केलेली ब्राह्मोसची पहिलीच चाचणी यशस्वी झाली. अचूक लक्ष्यवेध घेण्यात हे क्षेपणास्त्र यशस्वी ठरले.

### ]ब्राह्मोसबाबत..

भारत आणि रशियाच्या संयुक्त प्रकल्प असलेल्या 'ब्राह्मोस एरोस्पेस प्रायव्हेट लिमिटेड'तर्फे या क्षेपणास्त्राची निर्मिती केली जाते. ही क्षेपणास्त्रे पाणबुडी, युद्धनौका, विमाने किंवा जमिनीवरूनही प्रक्षेपित करता येतात. ब्राह्मोस ध्वनीच्या वेगापेक्षा जवळपास तिप्पट वेगाने उडते. भारत ब्राह्मोस क्षेपणास्त्रांची निर्यातही करत आहे. गेल्या वर्षी जानेवारीत भारताने क्षेपणास्त्राच्या तीन बॅटरी पुरवण्यासाठी फिलीपिन्ससोबत ३७ कोटी पाच लाखांचा करार केला होता.

# 'मोचा चक्रीवादळ' २०० किमी प्रति तास वेगाने बांगलादेश-म्यानमारच्या समुद्रकिनाऱ्यावर धडकलं

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने मोचा चक्रीवादळ तयार झालं आहे. या चक्रीवादळाने आता उग्र रूप धारण केलं असून ते २०० किमी प्रति तास वेगाने बांगलादेश-म्यानमारच्या समुद्रकिनाऱ्यावर धडकलं आहे. त्यामुळे बांगलादेश-म्यानमारच्या सीमावर्ती भागात मुळधार पावसाला सुरुवात झाली असून नागरिकांनी किनारपट्टीजवळ जाऊ नये, असं आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे.**



या चक्रीवादळाचा बांगलादेशच्या दक्षिण-पूर्व भागातील जिल्ह्यांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कॉक्स बाजार परिसरातून एक लाख ९० हजार लोकांना, तर चितगावमधून एक लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. या भागात मोठ्या प्रमाणात रोहिंग्या नागरिक राहत असल्याची माहिती स्थानिक विभागीय आयुक्त अमिनुर रहमान यांनी दिली आहे.

बांगलादेशप्रमाणे म्यानमारमधील राखीन भागातील १० हजार नागरिकांनाही सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे सुरु असलेल्या विश्व खाद्य कार्यक्रमांतर्गत येथील नागरिकांनी अन्न आणि इतर मदत दिली जात आहे.

दरम्यान, या चक्रीवादळाचा परिणाम ईशान्य-पूर्व भारतातील काही भागांवरही होण्याची शक्यता असून रविवारी (१४ मे) नागालँड, मणिपूर आणि दक्षिण आसाममधील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्या पार्श्वभूमीवर एनडीआरएफच्या आठ टीम पश्चिम बंगालमध्ये तैनात करण्यात आल्या आहेत. तर, एनडीआरएफचे २०० बचावकर्ते कार्यरत असून १०० बचावकर्ते राखीव ठेवण्यात आले आहेत. मोचा चक्रीवादळ सिडू चक्रीवादळानंतरचं सर्वात मोठं चक्रीवादळ आहे. सिडू चक्रीवादळ हे नोव्हेंबर २००७ मध्ये बांगलादेशच्या दक्षिणेकडील किनारपट्टीवर धडकले होते. या चक्रीवादळामुळे तीन हजारहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता.

## “माणसात देव असतो ऐकलं होतं अन्...”, उत्कर्ष शिंदेची

लोककलेची पिढीजात परंपरा यशस्वीरित्या सांभाळणारे आजचे आघाडीचे, प्रसिद्ध आणि लोकप्रिय गायक उत्कर्ष शिंदे येणार आहेत. उत्कर्ष शिंदे हा बिग बॉसमुळे प्रसिद्धीझोतात आला. उत्कर्ष शिंदे हा नेहमी काही ना काही कारणामुळे चर्चेत असतो. सध्या उत्कर्ष हा कामानिमित्ताने मारापूर गावात शूटींग करत आहे. नुकतंच त्याने या गावात शूटींग करतानाचा अनुभव सांगितला आहे.

उत्कर्ष शिंदे हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. नुकतंच उत्कर्षने काही फोटो शेअर केले आहेत. यासोबत त्याने माणसात देव असतो ऐकलं होत काल देवाच दर्शन घडलं, अशा आशयाखाली एक पोस्ट शेअर केली आहे. त्याची ही पोस्ट सध्या चांगलीच चर्चेत आहे.



शूटिंग साठी आम्ही मंगळवेढे माझ्या गावा नजीक मारापूर येथे शूट करत होतो.संध्याकाळ झाली,सूर्य प्रकाश मंदावला होता .आऊटडोर म्हंटलं कि चाहते आलेच सर्वाना भेटून सर्व सांभाळत शूट सुरु होत आणि त्यातच पाऊस धो धो पडू लागला .कॅमेरा ,ड्रोन ,गिम्बल पावसात कसबस सांभाळत पॅक अप केलं .परत रिसॉर्ट वर पोहोचलो आणि सर्वाना ओढ लागली .मुंबई परतीची .सर्वजण बॅगपॅक करतच होतो कि कानी आवाज पडला “सर कॅमेराची लेन्सकिट कुठे सापडत नाहीये.सर्वांची शोधा शोध सुरु झाली.

## “राजकीय क्षेत्रात काम करताना...”; उर्मिला मातोंडकरांनी सांगितलं पती मोहसिन यांची मिळाली साथ?

अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी आपले पती आपल्याला प्रत्येक गोष्टीमध्ये कशाप्रकारे पाठिंबा देतात याबाबत खुलासा केला आहे.

सुप्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री आणि शिवसेना नेत्या उर्मिला मातोंडकर यांचा विवाहसोहळा २०१६मध्ये थाटामाटात पार पडला. त्यांनी व्यावसायिक आणि मॉडेल मोहसिन अख्तर मीरशी लग्न केलं. अभिनयक्षेत्रात स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केल्यानंतर त्यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. पण उर्मिला यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये पती मोहसिन यांनी त्यांची साथ दिली. याचबाबत उर्मिला यांनी एका मुलाखतीमध्ये खुलासा केला आहे.



पिंक विलाला दिलेल्या मुलाखतीमध्ये उर्मिला यांनी आपलं पतीसोबत असणारं नातं तसेच त्यांचा आपल्याला असणार पाठिंबा याबाबत सांगितलं. “राजकीय क्षेत्रात काम करताना पती मोहसिन यांनी मला पाठिंबा दिला. ते मला पाठिंबा देत आहेत हे पाहून मलाही धक्काच बसला होता. प्रत्येकवेळी माझं मत सगळ्यांसमोर मांडण्याचं बळ, विश्वास त्यांच्याकडूनच मला मिळाला. याआधी कदाचित मी इतक्या आत्मविश्वासाने कधीच बोलली नसावी. म्हणूनच मी कायम म्हणते मुलगी, पत्नी आणि सून म्हणून मी स्वतःला नशिबवान समजेत.” असं उर्मिला यांनी यावेळी सांगितलं.

# द केरला स्टोरीपुढे बड्या स्टार्सचे सिनेमे ठरले फुसका बार!

मुंबई: केरळमधील मुलींचे धर्मांतर, त्यांच्यावर होणारे अत्याचार आणि त्यानंतर ISIS सारखी दहशतवादी संघटना या कथेवर आधारित सिनेमा 'द केरला स्टोरी'ची मोठी कमाई सुरू आहे. नवव्या दिवशी, शनिवारी 'द केरला स्टोरी'ने १०० कोटी क्लबमध्ये धमाकेदार एन्ट्री केली.
छ ो ट्य ा

बजेटच्या या चित्रपटावरुन कितीही वाद सुरू असला तरी कमाई मात्र गगनाला भिडली आहे. सुदिप्तो सेन दिग्दर्शित 'द केरला स्टोरी' सिनेमाने १०० कोटींचा गल्ला गाठत सिनेमा ब्लॉकबस्टर ठरला आहे. 'द केरला स्टोरी'ने ९व्या दिवशी किती कोटींचा गल्ला जमवला ते जाणून घेऊया...

बॉक्स ऑफिस इंडियाच्या रिपोर्टनुसार, या चित्रपटाने शुक्रवारी ११.५० कोटी रुपयांचा गल्ला जमवला आणि नवव्या दिवशी शनिवारी या सिनेमाने १२.५० कोटी रुपयांची कमाई केली. अदा शर्माच्या या सिनेमाने ९ दिवसांत एकूण १०१.५० कोटींचा गल्ला जमवला आहे. विपुल शाह यांच्या प्रोडक्शन हाऊसमध्ये बनलेल्या 'द केरला स्टोरी'साठी ही कमाई खूप मोठी आहे.



## सहा महिने एकत्र असतो, त्यानंतर आम्ही वेगवेगळं राहतो!

आपल्या अभिनयकौशल्यानं सई ताम्हणकरनं स्वबळावर मनोरंजनविश्वात स्थान निर्माण केलं. तिच्या आजवरच्या प्रत्येक भूमिकेला, कलाकृतीला प्रेक्षकांनी उचलून धरलं आहे. तिनं साकारलेल्या प्रत्येक व्यक्तिरेखेतून ती प्रेक्षकांना नव्यानं भेटते. गेल्या दोनेक वर्षांत सईनं 'धुरळा', 'पॉंडिचेरी', 'मीडियम स्पायसी', 'नवरसा', 'मिमी' यांसारख्या चित्रपटातून तिची



वेगळी छाप पाडली. 'बी.ई. रोजगार', 'पेट पुराण' सारख्या वेब सीरिजच्या निमित्तानं ओटीटीच्या (ओव्हर द टॉप) पडद्यावरदेखील तिच्या कामाचं कौतुक झालं. या यशस्वी प्रवासात तिला तिच्या आईची खंबीर साथ लाभली आहे, असं सई नेहमी आवर्जून सांगते. 'मदर्स डे'च्या निमित्तानं तिच्या मनातील आईविषयीच्या भावना तिनं 'मुंटा'शी शेअर केल्या आहेत.


सई तिच्या आईविषयी म्हणते, 'मी माझ्या आईला आणि मला स्वतःलादेखील तलवारीची उपमा देईन. एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत; तशा आम्ही दोघी आहोत. आम्ही वर्षातून सहा महिने एकत्र असतो. त्यानंतर आम्ही वेगवेगळं राहतो. त्या तलवारींचा प्रवास आणि त्यांनी लढलेल्या लढाया माझ्या दृष्टीनं खूप मोठ्या आहेत. अनेक लढाया जिंकून आम्ही आज आम्ही इथवर पोहोचलो आहोत.' आईसारखं वागता, बोलता, दिसता यावं असं मुलींना वाटत असतं. सईसुद्धा याला अपवाद नाही. 'मुलगी तिच्या आईचं प्रतिबिंब असते असं नेहमीच म्हटलं जातं. ते अगदी खरं आहे. तिच्यातला काम करण्याचा उत्साह, समर्पणाची भावना, तिच्या सभोवतालच्या लोकांप्रती असलेली तिची बांधिलकी या गोष्टी वाखणण्याजोग्या आहेत.

## म्हणून माधुरी दीक्षितसुपरस्टार!

बॉलिवूडमध्ये येणाऱ्या प्रत्येक मुलीला माधुरी दीक्षित व्हायचं असतं. पण तिचं फेम, नेम कोणाला मिळवणं शक्य होईल असं वाटत नाही. माधुरी दीक्षितला सिनेसृष्टीत ३५ हून जास्त वर्षे झाली आहेत. मात्र आजही माधुरीचं सौंदर्य टिकून आहे.

चंदेरी दुनियेतील माधुरीचा हा 'दिल'खेचक प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. सिनेसृष्टीत आज सुपरस्टार असलेल्या अनेक अभिनेत्री माधुरीला पाहून या क्षेत्रात आल्या, असं अभिमानानं सांगतात. तर अभिनेत्यांइतकं स्टारडम मिळवलेली ती एकमेव अभिनेत्री आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. तिनं लोकप्रियता मिळवलीच,सोबतच तिची इंडस्ट्रीत आदरयुक्त भीती असल्याचं म्हटलं जातं.

इतकंच नाही तर आजचे सुपरस्टार तिला आदरानं वागवतात. तिचे सहकलाकार अभिनेते तिला मॅम म्हणून हाक मारतात. माधुरीच्या करिअरच्या सुरुवातीला तिचं नाव संजय दत्त सोबत जोडलं गेलं होतं. पण आता हाच अभिनेता माधुराला मॅम असं म्हणतो. संजय दत्त आणि



माधुरी यांनी अनेक वर्ष इंडस्ट्रीत एकत्र काम केलंय. त्यामुळं ते एकमेकांना ‘अरे, तुरे’ म्हणूनच हाक मारत असतील असं तुम्हाला वाटत असेल. पण तसं नाहीये. संजय दत्त आजही माधुरीला ‘माधुरी मॅम’ असंच म्हणतो.

काही वर्षांपूर्वी दोघांचा ‘कलंक’ हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. जवळपास वीस वर्षांनंतर ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र आली होती. एका कार्यक्रमामध्ये संजयला ‘पुन्हा एकदा माधुरीसोबत काम करताना कसं वाटलं?’ असा प्रश्न विचारण्यात आला होता. तेव्हा 'माधुरी मॅमसोबत काम करताना खूप छान वाटलं' असं उत्तर त्यानं दिलं होतं. एवढी वर्षी इंडस्ट्रीमध्ये काम केल्यानंतरही तो अजूनही माधुरीला ‘मॅम’ म्हणतोय यावरुन उपस्थितांमध्ये चर्चा रंगली होती.

# गावस्करांनी जिंकली सर्वांची मने!

## » महेंद्रसिंग धोनीने गावस्कर यांना त्यांच्या शर्टवर आपली सही दिली

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सुनील गावस्कर आणि महेंद्रसिंग धोनी हे क्रिकेटमधील दोन महान खेळाडू. पण या दोघांनी चेन्नईचा सामना संपल्यावर सर्वांची मनं जिंकल्याची पाहायला मिळाले. चेन्नईचा हा त्यांच्या घरच्या मैदानातील अखेरचा सामना होता. पण या सामन्यात त्यांना केकेआरकडून पराभव पत्करावा लागला. चेन्नईचा पराभव झाला असला तरी चाहते जास्त निराश नव्हते. या गोष्टीला कारण ठरला धोनी. कारण हा चेन्नईचा अखेरचा सामना होता. त्यामुळे धोनी सामना संपल्यावर आपल्या मैदानातील चाहत्यांना काही भेटवस्तू देत होता आणि त्यामुळे चाहते धोनीची एक झलक जवळून पाहण्यासाठी उत्सुक होते. त्याचवेळी गावस्कर हे धोनीच्या जवळ गेले आणि त्यांनी जी गोष्ट केली त्यामुळे क्रिकेट चाहते अजूनच खूश झाले.**



हा सामना संपल्यावर धोनीची एक छोटेखानी मुलाखत झाली. ही मुलाखत संपल्यावर चेन्नईच्या संघाचा पूर्ण स्टाफ त्याची वाट पाहत होता. कारण त्यांनी आपल्याकडे बऱ्याच भेटवस्तू घेतल्या होत्या. या भेटवस्तू धोनी आपल्या चाहत्यांना देणार होता. चेन्नईच्या संघातील या व्यक्ती धोनीच्या हातात या वस्तू देत होते आणि धोनी ते स्टेडियममधील चाहत्यांच्या दिशेने फेकत होता. त्यावेळी चाहते या भेटवस्तू मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न करत होते. पण ही सर्व गोष्ट सुरु असताना मैदानात धोनीला भेटायला आले ते सुनील गावस्कर. गावस्कर भेटायला आल्याचे कळताच धोनीही थोडा थांबला. त्याने आपल्या चाहत्यांना भेटवसू देणे थोडा वेळ थांबवले. त्यानंतर धोनी आणि गावस्कर यांच्यामध्ये काही काळ बोलणे झाले. त्यानंतर धोनीने थेट आपला हात त्यांच्या शर्टच्या जवळ नेला. धोनीने गावस्कर यांना त्यांच्या शर्टवर आपली सही दिली आणि त्या दोघांमध्ये एकच स्मितहास्य पाहायला मिळाले. सही मिळाल्यावर गावस्कर यांनी धोनीला मिठी मारली आणि त्यानंतर त्यांनी त्याला शुभेच्छाही दिल्या. आतापर्यंत आयपीएलमध्ये अशी गोष्ट पाहायला मिळाली नव्हती. पण या सामन्यानंतर मात्र धोनी आणि गावस्कर या दोन्ही चाहत्यांमध्ये ही गोष्ट यावेळी पाहायला मिळाली.

मुंबईत सामना जिंकला आणि बंगळुरुत फटाके फुटले; स्वतःसाठी जमलं नाही ते आरसीबीसाठी केलं

धोनी आणि गावस्कर हे दोघेही महान खेळाडू आहेत. त्यामुळे या दोघांनी जे काही केलं त्यामुळे चाहते खूश झाले आहेत.

### धोनीचा धुमधडाका...

» महेंद्रसिग धोनीचा सध्याच्या घडीला धुमधडाका आयपीएलध्ये सुरु आहे. धोनी जेव्हा जेव्हा फलंदाजीला उतरतो तेव्हा त्याच्या नावाचा जयघोष ऐकल्यावाचून राहत नाही. पण या गोष्टीचा कारणही तसेच आहे. कारण गेल्या १२ सामन्यांमध्ये धोनीने जी फटकेबाजी केली आहे ती सर्वात महत्वाची ठरली आहे. कारण गेल्या -१२ सामन्यांतील धोनीचा स्ट्राइक रेट हा दमदार असल्याचे समोर आले आहे. धोनी आतापर्यंत अखेरच्या षटकांमध्येच फलंदाजीला आल्याचे पाहायला मिळाले आहे. पण फार कमी चेंडूंमध्ये धोनीने जास्त धावा केल्याचे पाहायला मिळाले आहे. तुम्ही किती कमी चेंडूंत जास्त धावा करता हे टी-२० क्रिकेटमध्ये महत्वाचे असते. त्यामुळे टी-२० क्रिकेटमध्ये स्ट्राइक रेट सर्वात महत्वाचा असतो. धोनीने तर या आयपीएलमध्ये सर्वात जलद फलंदाजी केली आहे. त्यामुळे त्याचा स्ट्राइक रेट भन्नाट आहे. या आयपीएलमधील पहिल्या १२ सामन्यांमध्ये धोनीने दमदार फटकेबाजी केली आहे. पण त्याच्या नावावर ९६ धावा आहेत. पण या धावा ९६ पेक्षा फारच कमी चेंडूंमध्येच आल्या आहेत. त्यामुळे या पहिल्या १२ सामन्यांमध्ये धोनीचा स्ट्राइक रेट हा हे २०४.२५. या गोष्टीवर कोणाला विश्वास बसणार नाही, पण धोनीने या आयपीएलमध्ये २०० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने फलंदाजी केल्याचे पाहायला मिळाले आहे. त्यामुळेच धोनी या आयपीएलमध्ये सर्वात जास्त लोकप्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. अखेरच्या षटकांमध्ये तो फलंदाजीला येतो आणि फार कमी चेंडूंमध्ये जास्त धावा करत असल्याचे पाहायला मिळाले आहे. त्यामुळे धोनीची सरासरी जरी कमी असली तरी त्याचा स्ट्राइक रेट हा फार चांगला आहे.

---

# वॉकरचा आधार घेऊन चालताना दिसला केएल राहुल!

## » शस्त्रक्रियेनंतरचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**IPL आयपीएल २०२३ मधून लखनऊ संघाचा कर्णधार केएल राहुल दुखापतीमुळे बाहेर झाला होता. आता त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शस्त्रक्रियेनंतर केएल राहुलचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**



आयपीएल २०२३ मध्ये लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार केएल राहुल दुखापतीमुळे संघाबाहेर गेला होता. यानंतर त्याच्यावर शस्त्रक्रियाही करण्यात आली आहे. दरम्यान, राहुलने शस्त्रक्रियेनंतरचे त्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. ज्यात तो बरा होताना दिसत आहे. हे फोटो सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. चाहतेही त्यावर प्रतिक्रिया देत आहेत.

यादरम्यान केएल राहुलने इंस्टाग्रामवर एक अपडेट देखील दिले की त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली आहे आणि ती यशस्वी झाली आहे. यानंतर, आता त्याने त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम पेजवर फोटो शेअर केले आहेत, ज्यात तो बरा झालेला दिसत आहे. त्याने शेअर केलेल्या पहिल्या फोटोमध्ये तो वॉकरच्या मदतीने चालताना दिसत आहे, तर दुसऱ्या फोटोमध्ये त्याची पत्नी अथिया शेट्टीही त्याच्यासोबत दिसत आहे. यासोबतच त्याने आणखी दोन फोटोही शेअर केले आहेत, ज्यात त्याचा वॉकर आणि आकाश दिसत आहेत.

राहुलच्या या फोटोंवर चाहते जोरदार कमेंट करत आहेत. चाहत्यांनी त्याला लवकरात लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. चाहते म्हणत आहे की संघात केएल राहुलची उणीव भासत आहे. एका चाहत्याने कमेंट सेक्शनमध्ये लिहिले की, तो नसल्याने संघात कमी जाणवत नाही, पण राहुलने आता आराम करावा आणि बरे होऊन भारतीय संघात परतावे अशी त्याची इच्छा आहे. खरं तर, १ मे रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात त्याला दुखापत झाली होती. या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना त्याच्या पायाच्या अंगठ्याला दुखापत झाली होती.

### लखनऊ सध्या चौथ्या स्थानावर

» केएल राहुलच्या अनुपस्थितीत, कृणाल पांड्या सध्या लखनऊ सुपर जायंट्सची कमान सांभाळत आहे. त्याच्या नेतृत्वाखाली लखनऊने शनिवारी सनरायझर्स हैदराबादविरुद्धचा सामना ७ गडी राखून जिंकला. लखनऊने या आयपीएलमध्ये आतापर्यंत १२ सामने खेळले आहेत, त्यापैकी ६ सामने त्यांनी जिंकले आहेत तर एक सामना पावसामुळे रद्द झाला आहे. लखनऊ सध्या १३ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.

# रिंकू आणि नितिशने केली चेन्नईची धुलाई!



। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

चेन्नईच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना १४४ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना केकेआरची ३ बाद ३३ अशी अवस्था होती. पण त्यानंतर रिंकू आणि नितिश यांनी केकेआरला विजय मिळवून दिला.

रिंकू सिंग आणि नितिश राणा यांनी चेन्नईच्या गोलंदाजीची जोरदार धुलाई केली. त्यामुळे केकेआरच्या संघाला यावेळी विजयासह आपले आव्हान जीवंत ठेवता आले आहे. या सामन्यापूर्वी केकेआरचे १० गुण होते, पण या विजयानंतर आता त्यांनी प्ले ऑफचे आव्हान कायम ठेवले. चेन्नईने यावेळी केकेआरपुढे विजयासाठी १४५ धावांचे आव्हान ठेवले होते. पण रिंकू आणि राणा यांनी दमदार फलंदाजी करत संघाला सहा विकेट्स राखून विजय मिळवून दिला.